सकाळ | कोल्हापूर
कोल्हापूर, शनिवार, १४ सप्टेंबर २०१९
TODAY
SakalNews | @esakalupdate | www.esakal.com
Call Center : 9225800800

## अवतीभवती



गडहिंग्लज : आंतरविभागीय क्रॉसकंट्री स्पर्धेतील यशस्वी ओंकार कॉलेजच्या खेळाडूंसमवेत राजन पेडणेकर, सुरेश चव्हाण, सुरेश धुरे, बसवराज मगदूम आदी.

# आंतरविभागीय क्रॉसकंट्री स्पर्धेत ओंकार महाविद्यालय तृतीय

**गडहिंग्लज :** सातारा येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय क्रॉसकंट्री स्पर्धेत येथील ओंकार कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने तृतीय क्रमांक पटकावला. वैभव पाटील याने वैयक्तिक स्पर्धेत पाचवा क्रमांक मिळविला. त्याची कर्नाटकातील मंगळूर येथे होणाऱ्या भारतीय आंतरविद्यापीठ क्रॉसकंट्री स्पर्धेसाठी विद्यापीठ संघात निवड झाली. महाविद्यालयाच्या संघात रोहन मुसळे, सौरभ नलवडे, शुभम सावंत, राहूल देसाई, महादेव घुगरे यांचा समावेश होता. संस्थाध्यक्ष राजन पेडणेकर, प्र. प्राचार्य डॉ. सुरेश चव्हाण, बसवराज मगदूम व प्रकाश कांबळे यांचे प्रोत्साहन मिळाले. सुरेश धुरे यांचे मार्गदर्शन मिळाले.